**वसई विरार शहर महानगरपालिका**
**प्रेस नोट**

**दि.२८/०८/२०२५**

## रमाबाई अपार्टमेंट, चामुंडानगर, स्वामी समर्थ नगर (जुने), विजयनगर, विरार (पु.) येथील दुर्घटनेबाबत

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती "सी" चंदनसार मधील चामुंडानगर, स्वामी समर्थ नगर, विजयनगर, नारंगी रोड, विरार (पू.) येथील रमाबाई अपार्टमेंट या इमारतीचा मागील भाग मंगळवार दि. २६/०८/२०२५ रोजी रात्री सुमारे ११.४५ वा. दरम्यान अचानक कोसळला. याबाबत माहिती मिळताच घटनास्थळी तात्काळ महानगरपालिकेचे आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी पोहचले. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी NDRF चे कर्मचारी, महसूल प्रशासन तसेच पोलिस प्रशासनास सदर घटनेबाबत अवगत केले आणि त्यानंतर NDRF चे कर्मचारी महसूल प्रशासन व पोलिस प्रशासनाचे कर्मचारी घटनास्थळी हजर झाले. एन.डी.आर.एफ ची तुकडी आणि महानगरपालिकेचे आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी यांचेमार्फत बचावकार्य युध्द पातळीवर सुरु करण्यात आले. प्रत्यक्ष अपघातग्रस्त इमारत (G+4) असून बाजूला चाळी असल्याने याठिकाणी अत्यंत दाटीवाटीच्या या ठिकाणी तात्काळ बचाव मोहीम सूरु करण्यात आली. सदर ठिकाणी मा.जिल्हाधिकारी, पालघर, मा.आयुक्त वसई विरार शहर महानगरपालिका, उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी वसई, पोलिस उपआयुक्त यांनी घटनास्थळी भेट दिली.

सदरील इमारतीमध्ये एकूण ५० सदनिका आहेत. त्यापैकी सदर इमारतीचा पाठीमागचा भाग (अंदाजे १२ सदनिका) कोसळला. या इमारतीपासून बाजूला असलेल्या चाळींना व इतर इमारतीनाही धोका असल्याने तेथील रहिवाश्यांना तात्काळ स्थलांतरीत करण्यात आले तसेच शेजारील चाळीतील आठ खोल्या पाडून यंत्रसामुग्री आत जाण्यास जागा करण्यात आली. मा. आयुक्त महोदयांनी सदर ठिकाणी पाहणी केली आणि पोलिस कर्मचारी अग्निशमन कर्मचारी आणि NDRF यांचेमार्फत दोन तासाचा वेळ देऊन रहिवाश्यांचे आवश्यक तसेच मौल्यवान

वस्तू रहिवाशांच्या ताब्यात देण्याचे आदेशित केले. यानुसार आवश्यक आणि मौल्यवान वस्तूंचा ताबा रहिवाश्यांकडे देण्यात आला.

**अपघातग्रस्त रहिवाशांची यादी खालीलप्रमाणे..**

| अ.क्र. | नावं | वय | तपशिल |
|---|---|---|---|
| १. | श्री.प्रभाकर शिंदे | ५७ वर्ष | महानगरपालिकेचे तुळींज हॉस्पिटल |
| २. | श्रीम.प्रमिला प्रभाकर शिंदे | ५० वर्ष | प्रकृती हॉस्पिटल, बोळींज विरार (प.) |
| ३. | श्रीम.प्रेरणा शिंदे | २० वर्ष | महानगरपालिकेचे तुळींज हॉस्पिटल |
| ४. | श्री.प्रदीप कदम | ४० वर्ष | उपचारानंतर सोडण्यात आले |
| ५. | श्रीम.जयश्री कदम | ३३ वर्ष | उपचारानंतर सोडण्यात आले |
| ६. | श्रीम.मिताली परमार | २८ वर्ष | संजीवनी हॉस्पिटल, विरार (प.) |
| ७. | श्रीम.संजॉय सिंग | २४ वर्ष | प्रकृती हॉस्पिटल, बोळींज विरार (प.) |
| ८. | श्री. मंथन शिंदे | १९ वर्ष | प्रकृती हॉस्पिटल, बोळींज विरार (प.) |
| ९. | श्रीम. विशाखा जोवील | २४ वर्ष | प्रकृती हॉस्पिटल, बोळींज विरार (प.) |
| १०. | श्रीम. आरोही ओंकार जोवील | २४ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| ११. | उत्कर्षा जोवील | १ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| १२. | श्री.लक्ष्मण किसकु सिंग | २६ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| १३. | श्री.दिनेश प्रकाश सकपाळ | ४३ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| १४. | श्रीमती.सुप्रिया निवळकर | ३८ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| १५. | कु. अर्णव निवळकर | ११ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| १६. | श्रीमती. पार्वती सकपाळ | ६० वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| १७. | श्री.दिपेश सोनी | ४१ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| १८. | श्री.सचिन निवळकर | ४० वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| १९. | श्री.हरिश सिंग बिष्ट | ३४ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| २०. | श्रीम. सोनाली रुपेश तेजाम | ४१ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| २१. | श्री. दिपक सिंग बोहरा | २५ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| २२. | श्रीम. कशिश पवन सहेनी | ३५ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| २३. | श्रीम. शुभांगी पवन सहेनी | ४० वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| २४. | श्री.गोविंद सिंग रावत | २८ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| २५. | श्री. ओंकार जोवील | २७ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |
| २६. | श्रीम. रोहीणी चव्हाण | ३७ वर्ष | मयत, ग्रामीण रुग्णालय,विरार (प.) |

शोधमाहिम दरम्यान ९ रहिवाश्यांना सुखरुप बाहेर काढण्यात आले. संबधित ९ जणांवर महानगरपालिकेच्या तुळींज हॉस्पीटल या रुग्णालयामध्ये तसेच खाजगी रुग्णालयात उपचार चालु आहेत माहिमे दरम्यान १७ रहिवाशी मयत आढळले असून यामध्ये ०६ महिला ०८ पुरुष ०३ लहान बालकांचा समावेश आहे. मयत व्यक्तींचे शवविच्छेदन ग्रामीण रुग्णालय विरार यांचे मार्फत करण्यात येत आहे. शवविच्छेदनानंतर मृत व्यक्तीचे अंतिम संस्कार करणेबाबत पालिका प्रशासनाकडून मृत व्यक्तींच्या नातेवाईकांना सर्व प्रकारची मदत करण्यात येत आहे. काही मृत व्यक्तींचे शव त्यांच्या मुळ गावी नेण्याचीही व्यवस्था महापालिका प्रशासनामार्फत करण्यात आलेली आहे. सुरक्षेच्या दृष्टीने रमाबाई अपार्टमेंट इमारतीच्या बाजुची इमारत व आजुबाजुच्या चाळींमधल्या खोल्या देखील रिकाम्या करुन तेथील नागरीकांचे सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. महानगरपालिकेच्या वतीने या सर्व बाधीत नागरीकांची तात्पुरती राहण्याची व भोजनाची सोय समाज मंदीर विरार पुर्व येथे करण्यात आलेली आहे.

दुर्घटनाग्रस्त इमारतीच्या बांधकामास जबाबदार असणाऱ्या जमीन मालक आणि विकासकाविरुध्द महानगरपालिकेने विरार पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्र. ४८०/२०२५ अन्वये दाखल केला असुन त्यास पोलिसांनी अटक केली आहे.